# ।। अथ सप्त गुरा को अंग ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

* वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## ।। अथ सप्त गुरा को अंग लिखंते ।।

।। साखी ।।

बाप माय गुरू पेल है ।। सुणज्यो सब संसार ।।
रगत बुंद सुखराम क्हे ।। बिगसी धात बिचार ।।१।।

माता पिता हे पहिले गुरु आहेत.हे सर्व संसारी स्त्री-पुरुष समजा.मातेचे रक्त व पित्याचे बुंद यांच्यापासून मनुष्य देह बनला.पित्याचा धातू निघाला नसता तर मनुष्य देह मिळालाच नसता. म्हणून माता-पिता हे पहिले गुरु आहेत. ।।१।।

फिर सुणज्यो गुण ओ करे ।। दस दिन पाळे देह ।।
अन्न जळ सो सुखराम के ।। बाळक लग मुख लेह ।।२।।

माता दहा दिवस देहाचे पालन करते.अन्न पाणी मुखात देते.।।२।।

मात पिता गुर अे सही ।। तिण मे फेर न सार ।।
मोख मिले सुखराम के ।। वे गुरू ओर बिचार ।।३।।

अशाप्रकारे माता व पिता हे पहिले गुरु आहेत.याच्यात काही फरक समजू नका.परंतु काळापासून मोक्ष मिळतो तो गुरु माता पिता या पहिल्या गुरुपेक्षा न्यारा आहे.याचा सर्वांनी विचार करावा.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज महाराज बोलले.।।३।।

दुजो गुरू सुखराम के ।। दाई है जुग माय ।।
मळ मुत्र सुं काड़ कर ।। लीयो कंठ लगाय ।।४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले,जगात प्रत्येकाचा दुसरा गुरु दाई आहे.दाई जीवाला मलमुत्रातून काढून कंठाशी लावते. ।।४।।

दस दिन कर हे चाकरी ।। न्हाय झुलावे आण ।।
दाई गुर सुखराम केह ।। इता गुणा बखाण ।।५।।

दहा दिवस न्हाऊ घालणे,मलमुत्रातून साफ करणे,झोक्यात झोपविणे,झोका देणे इ. काम करते. ।।५।।

दाई गुरू गुण अे किया ।। सुणज्यो सब संसार ।।
पार लंघे सुखराम के ।। सो गुरू करो बिचार ।।६।।

म्हणून दाई ही सर्व स्त्री-पुरुषांचा दुसरा गुरु आहे.दाई हे वरील सर्व गुण करते परंतु पार नाही लांघू शकत.सुख प्राप्त करण्याकरीता काळाच्या पलिकडे अशा गुणधारी सतगुरुचा विचार करा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।६।।

तीजा गुर सुखराम के ।। बिपर कहिये जाण ।।
वे दाता इण बस्त का ।। नाव कडावे आण ।।७।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज विप्र हा सर्व स्त्री-पुरुषांचा तिसरा गुरु आहे. तो

शरीराचे नाव काढण्याचा दाता आहे. ।।७।।

बामण गुरू सुखराम के ।। इण देहि का होय ।।
जामण मरणे चाहिये ।। ता गुण पुजे लोय ।।८।।

अशाप्रकारे ब्राम्हण हा या देहाचा तिसरा गुरु आहे परंतु जन्म मरण मिटविणे चाहत असाल तर ज्याच्यात जन्म मरण मिटविण्याचा गुण आहे.त्याला सर्व स्त्री–पुरुष पुजा. ।।८।।

ब्राम्हण गुरू सुखराम के ।। सुनज्यो सब नर नार ।।
देह को पाड्यो नाम रे ।। ओ फळ दियो बिचार ।।९।।

अशाप्रकारे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांना बोलले,ब्राम्हणाने देहाला नाव देण्याचे फळ दिले. ।।९।।

मात पिता गुर बुंद का ।। दाई गुरू सम्पड़ाय ।।
ब्राम्हण गुरू सुखराम के ।। नाव पड़ायो आय ।।१०।।

माता–पित्याने देह देण्याचे फळ दिले.दाईने शरीराला न्हाऊ घातले,धुतले,साफ सुतरे ठेवण्याचे फळ दिले.अशाप्रकारे देहाचे तीन गुरु बनले.।।१०।।

अे तीनुं गुरू हद का ।। बेहद का गुर नाय ।।
ब्राम्हण सुंण सुखराम के ।। जती बेद का कुवाय ।।११।।

माता–पिता,दाई,ब्राम्हण हे तिन्ही गुरु हद्दीचे सुख देणारे आहेत. ।।११।।

ब्राम्हण पाडे नांव रे ।। जती पढावे आण ।।
अे गुर तो सुखराम के ।। यां चीजा का जाण ।।१२।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले,ब्राम्हण वेदाच्या आधाराने जाती सांगतात. अशाप्रकारे ब्राम्हण नाव व जातीचे ज्ञान देतो.अशाप्रकारे हे तिन्ही गुरु वरील गोष्टींचे आहेत.मोक्ष देणारे नाही. ।।१२।।

आयस सांमी ढुंढिया ।। बेरागी गुरू जाण ।।
अे बगसे सुखराम के ।। साँग पदार्थ आण ।।१३।।

आयस,स्वामी,ढुंढ्या,वैरागी यांना गुरु म्हणतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले, हे गुरु त्यांचे सोंग म्हणजे देहाच्या वेषाचे ज्ञान देतात. ।।१३।।

षट दर्शण बेराग रे ।। अे देह का गुर जाण ।।
अे कूं को गुण करत हे ।। सब ही हद का आण ।।१४।।

अशाच प्रकारचे ब्राम्हण पकडून षटदर्शनी सर्व गुरु देहाचे गुरु आहे.हे सर्व हद्दीमध्ये ठेवण्याचे एकमात्र गुण करतात. ।।१४।।

षट दर्शण गुर देह का ।। दिन मे करो पचास ।।

बिन सत्तगुरू सुखराम केहे ।। झूठ मुगत की आस ।।१५।।

अशाप्रकारे हे देहाचे षटदर्शन(जोगी,जंगम,सेवडा,संन्यासी,फकीर,ब्राम्हण)गुरु देहाचे गुरु आहेत.हे जरी दिवसातून पन्नास केले तरी मुक्ती होणार नाही.हे सर्व गुरु मोक्षाची खोटी आशा लावतात.मोक्ष फक्त सतगुरु केल्यानेच मिळतो. ।।१५।।

जंतर अंतर अकल रे ।। लख चीजा दे आण ।।
भेद बिना सुखराम के ।। सब देह का गुरू जाण ।।१६।।

हे हद्दीचे गुरु जंतर मंतर अक्कल अशी तीन लोक चौदा भवनापर्यंत लक्षावधी पर्चे चमत्काराच्या वस्तु आणून सांगतात.यांच्याजवळ काळापासून सुटण्याचा भेद राहत नाही. म्हणून हे सर्व देहाचे गुरु जाणा. ।।१६।।

देह का गुरू सुं मुगत रे ।। सुण देही की होय ।।
आतम की सुखराम केहे ।। सत्तगुर के संग जोय ।।१७।।

या देहाच्या गुरुपासून देहाची मुक्ती होते,जिवात्माची होत नाही.जिवात्म्याची मुक्ती हवी असेल तर सतगुरुंचा संग करायला हवा.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।१७।।

भेद बिना सुखराम के ।। सब देह का गुरू होय ।।
करणी की सुण क्या चली ।। नाव रटावे कोय ।।१८।।

काळापासून सुटण्याचा भेदा शिवाय आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले सर्व गुरु देहाचे गुरु आहेत.हे गुरु करण्या शिकवतात.येथ पर्यंत ही हद्दीपर्यंत पोहचण्याचे नाव ही शिकवितात.परंतु हद्दीच्या बाहेर नाही सुखाच्या बेहद्दीमध्ये पोहचवत नाही. ।।१८।।

सत्तगुर हे इण जीव का ।। सुणज्यो ग्यानी लोय ।।
दूजा गुरू सुखराम के ।। सब देही का होय ।।१९।।

सर्व ज्ञानी ऐका,या जीवाचा गुरु फक्त सतगुरु आहे.दुसरे सर्व गुरु देहाचे आहेत.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।१९।।

मोख मिलण की चाय व्हे ।। तो सत्तगुर कीज्यो आय ।।
दुजा गुर सुखराम के ।। सब ही कर्म उपाय ।।२०।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांना बोलले की,मोक्ष मिळण्याची चाहणा आहे तर सतगुरुला शोधून धारण करा.सतगुरु सोडून दुसरे सर्व गुरु काळाच्या मुखात ठेवणारे कर्मांचे उपाय आहेत. ।।२०।। ।। इति सप्तगुरा को अंग संपूरण ।।